पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३५६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५
ई-मेल estt3.pco.pune@nic.in

क्र:आस्था-३(१)/चा.पो.भ.-२०२२-२३/नियुक्ती आदेश-०१/२०२४,
दिनांक - ०६/१०/२०२४.

संदर्भ :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०१९.

विषय :- पोलीस शिपाई चालक भरती – २०२२-२३.
पोलीस शिपाई चालक पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

---ooo---

**नियुक्ती आदेश :-**

पुणे शहर पोलीस घटकांत रिक्त असलेल्या पोलीस शिपाई चालक पदाकरीता पोलीस भरती -२०२२-२३ ही माहे जून २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये राबविण्यात आली होती. सदर चालक पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा, वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी व मैदानी चाचणी मध्ये गुणानुक्रमे, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमूद पुरुष व महिला उमेदवारांची पोलीस शिपाई चालक पदासाठी निवड झालेली आहे. सदर उमेदवार वैद्यकिय चाचणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्र. ६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील उमेदवारांना पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर " **पोलीस शिपाई चालक (गट-क)**" या संवर्गात सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील **वेतन** स्तर एस-७ **रुपये** २१७००-६९१०० व विशेष वेतन रु. ७५०/- (अधिक नियमानुसार **वेतन** व भत्ते) **या** वेतनावर दिनांक - ०७/१०/२०२४ रोजीपासून **पोलीस शिपाई चालक** या पदावर खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती करण्यांत येत आहे. तरी सदर उमेदवार यांनी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर पुणे येथे **दिनांक** -०७/१०/२०२४ रोजी हजर रहावे.

| अ. क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नांव | लिंग | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10570 | KAVERI AMBADAS JADHAV | FEMALE | SC | SC Female | None |
| 2 | 4134 | DNYANESHWAR PANDURANG LAHANGE | MALE | ST | ST General | None |
| 3 | 10549 | APEKSHA BANSILAL PATIL | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 4 | 10912 | POURNIMA GANESH SAPKALE | FEMALE | SC | SC Female | None |
| 5 | 10206 | PRASHANT BANDU WANJARI | MALE | OBC | OBC General | None |
| 6 | 10231 | GOVIND BHAKTRAJ MITAKE | MALE | ST | ST General | None |
| 7 | 11251 | KAJAL PUNAJI KATKAR | FEMALE | SEBC | SEBC Female | None |
| 8 | 10683 | KOMAL RAMCHANDRA GHOLVE | FEMALE | NT(D) | NT-D Female | None |
| 9 | 8842 | NIKHIL RAJENDRA BHOSALE | MALE | SEBC | Open General | None |
| 10 | 8332 | SUSHANT BHANUDAS DHANAWADE | MALE | SEBC | SEBC General | None |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 7802 | SURESH LAKSHMAN ZORE | MALE | NT(C) | Open General | None |
| 12 | 4857 | MANGAL AMBADAS CHIBHDE | MALE | ST | ST General | None |
| 13 | 1542 | DEVANAND LAYAPPA POTENAVARU | MALE | SC | SC General | None |
| 14 | 9392 | RAMA MAHADU MOTE | MALE | NT(C) | NT-C General | None |
| 15 | 6587 | AKSHAY BAPU SHIRKE | MALE | SEBC | SEBC General | None |
| 16 | 5426 | PRAVIN LALASAHEB SHITOLE | MALE | OBC | Open General | None |
| 17 | 8827 | RUSHIKESH ROHIDAS SALVE | MALE | NT(C) | Open General | None |
| 18 | 5862 | VISHAL AMBADAS PUNEKAR | MALE | SEBC | Open General | None |
| 19 | 11366 | MAYURI ANIL CHORMALE | FEMALE | NT(C) | NT-C Female | None |
| 20 | 11025 | PRATIBHA ARUN JAGADALE | FEMALE | EWS | EWS Female | None |
| 21 | 11071 | PRAJAKTA FAKKAD PUNDE | FEMALE | OBC | Open Female | None |
| 22 | 3128 | TRISHUL GAJANAN BORKAR | MALE | NT(B) | NT-B General | None |
| 23 | 11003 | YAYATI MOTIGIR BAMANE | FEMALE | NT(B) | NT-B Female | None |
| 24 | 6087 | SANKET SHIVDAS JAWARKAR | MALE | OBC | OBC General | None |
| 25 | 10537 | RAJASHREE RAMDAS BODKHE | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 26 | 10993 | ASMA SHABBIR SHAIKH | FEMALE | EWS | EWS Female | None |
| 27 | 10546 | VANITA JAGANNATH DUTE | FEMALE | ST | ST Female | None |
| 28 | 11391 | PRATIKSHA SURESH ANANDKAR | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 29 | 6228 | SHUBHAM NAMDEV WAGASKAR | MALE | OBC | OBC General | None |
| 30 | 10318 | SAGAR SHARAD SHETE | MALE | SC | SC General | None |
| 31 | 3173 | MUKESH JALINDAR VAIRAL | MALE | SC | SC General | None |
| 32 | 6928 | SHIVDAS TUKARAM CHAUDHARI | MALE | OBC | OBC General | None |
| 33 | 3170 | ANKUSH SURESH SALVE | MALE | SC | SC General | None |
| 34 | 11345 | POOJA SOMNATH GHATE | FEMALE | SBC | SBC Female | None |
| 35 | 10897 | PRATIKSHA SHARAD SHETE | FEMALE | SC | Open Female | None |
| 36 | 1062 | MAROTI DIGAMBAR VAVDHANE | MALE | ST | ST General | None |
| 37 | 10820 | RUTUJA YASHWANT GOGAWALE | FEMALE | OBC | Open Female | None |
| 38 | 10821 | NEHA DILIP GHENAND | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 39 | 11031 | SUPRIYA BALASO KUMBHAR | FEMALE | OBC | Open Female | None |
| 40 | 10813 | PRAJAKTA HANMANT MALI | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 41 | 11375 | POOJA DHANPAL GALATGE | FEMALE | EWS | EWS Female | None |
| 42 | 7762 | SOURABH BABURAO PATIL | MALE | SEBC | SEBC General | None |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 43 | 6895 | VISHAL MAHADU SONAWANE | MALE | ST | ST General | None |
| 44 | 1247 | PRAVIN UKHARDU RATHOD | MALE | VJ(A)/ DT(A) | VJ-A General | None |
| 45 | 5247 | VILAS RATAN SHIMRE | MALE | OBC | Open General | None |
| 46 | 124 | SHRIRAM AMBADAS BADHE | MALE | NT(D) | Open General | None |
| 47 | 11087 | SAYALI KAILAS GAIKWAD | FEMALE | NT(C) | NT-C Female | None |
| 48 | 6499 | GOPAL CHANGDEV PATULE | MALE | SEBC | SEBC General | None |
| 49 | 3629 | RAMESHWAR GYANDEV SARJE | MALE | ST | ST General | None |
| 50 | 6188 | RAVIRAJ BHIMRAO CHORMALE | MALE | NT(C) | NT-C General | None |
| 51 | 6189 | SHUBHAM MANMATH DAINGADE | MALE | SEBC | Open General | None |
| 52 | 8266 | KRUSHNA SANTOSH MULEY | MALE | SEBC | Open General | None |
| 53 | 3912 | PAVAN SANJAY AMBAT | MALE | VJ(A)/ DT(A) | VJ-A General | None |
| 54 | 10934 | KIRTI AJINATH SHIRKE | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 55 | 6076 | DHANANJAY SUBHASH CHOUGALE | MALE | OBC | OBC General | None |
| 56 | 10638 | SIMRAN SANTOSH CHAUDHARI | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 57 | 11287 | RENUKA HEMALU RATHOD | FEMALE | VJ(A) | VJ-A Female | None |
| 58 | 11286 | VIJAYALAXMI DATTAPPA CHANDAKE | FEMALE | OBC | OBC Female | None |
| 59 | 7859 | VILAS MAHADEV GODASE | MALE | OBC | OBC General | None |
| 60 | 6030 | SHUBHAM NAGNATH DARGUDE | MALE | NT(C) | Open General | None |
| 61 | 10456 | SURAJ JAGANNATH ALUGADE | MALE | SEBC | SEBC General | None |

<u>अटी व शर्ती खालील प्रमाणे :-</u>

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

२. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.,शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२-१२-२०११ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आंत निकाली काढणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर आपणांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व आपल्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

५. चालक पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यांत चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही

Scanned with OKEN Scanner

वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडपून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६. प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

७. प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास,पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहील्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सूचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

८. पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, कर्तव्यात बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी केल्याचे निदर्शनास आल्यास, आपण या घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केंव्हाही प्रशासकीय कारणास्तव बदलीस पात्र राहाल.

९. चालक पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास, पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१०. ज्या संवर्गातुन-जातीच्या प्रवर्गातुन चालक पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग /प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

११. चालक पोलीस शिपाई या पदावर रुजू झाल्या तारखेपासून तीन महिन्याचे आंत उमेदवारांने महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि. क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दिनांक २०-११-१९८० व शा. नि. क्र. वसीअ-१४१४/प्र.क्र.२६/११, दि. ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वत:हुन भरुन संबंधीत आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

१२. शासन निर्णय क्र.अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक ०६/०४/२०१५ अन्वये दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना **राष्ट्रीय निवृत्ती योजना (NPS)** लागू राहिल. **किंवा** महाराष्ट्र शासन वित्त विभाग कडील शासन निर्णय क्र. सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/ सेवा-४ दिनांक २०/०९/२०२४ मधील तरतुदींनुसार केंद्र सरकारने दि.२४/०८/२०२४ रोजी घोषित केलेली **एकीकृत निवृत्तिवेतन योजना (UPS)** लागू राहिल. सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्ती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणांस लागू होणार नाही.

१३. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्रक्र-१७/२०००/बारा, दिनांक २८/०३/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा आधिक असेल तर दिनांक २८-०३-२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे अनर्ह ठरविण्यांस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

१४. महाराष्ट्र शासन,गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६-०९-२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दि.२६-०४-२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यांस विनंती केल्यास त्या उमेदवाराकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे. त्या प्रशिक्षणा खर्च म्हणून प्रती महिना रुपये २०००/- (प्रती मासिक रुपये दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यांत येईल, व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यांत येईल. याबाबतचे हमीपत्र देणे आपणांस बंधनकारक आहे.

१५. चालक पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली,१९५९ भाग-१ मधील नियम क्र.७८ (१) (V) ते (viii) अन्वये आपली सेवा केंव्हाही समाप्त करण्यांत येईल.

१६. चालक पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण करण्यांस टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास/ भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली,१९९९ भाग-१ मधील नियम ७८ उपनियम (१) मधील VIII खालील टिप नुसार तुमची सेवा समाप्त ( Terminate from Service) करण्यांत येईल.

१७. महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम-२०१९ मधील नियम १५ चा उपखंड (१) मधील तरतुदींनुसार पोलीस शिपाई चालक पदावर नियुक्ती झालेल्या नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई यांना राज्यातील कोणत्याही पोलीस प्रशिक्षण केंद्रात मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील व सदर प्रशिक्षणांती घेण्यांत येणारी परीक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर ०४ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना

Scanned with OKEN Scanner

वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच सदर नियमातील उपखंड (२) मधील तरतुदीनुसार वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण झाल्यास रोखून ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखून ठेवल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

१८. महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम-६ चा उपखंड (१) (क) (२) नुसार जड वाहन (HGV) आणि जड वाहन प्रवासी (HPMV) चालविण्याचा परवाना धारण करणे बंधनकारक राहील. परंतु, सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून पुढील ५ वर्षात प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक राहिल. जर या कालावधीत परवाने धारण न केल्यास, चालक पोलीस शिपाई पदासाठीची निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात यईल.

१९. महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मधील नियम ६ चा उपखंड (१) (क) (३) नुसार उमेदवार हा मादक द्रव्ये किंवा मद्य सेवन करुन वाहन चालविण्याकरिता मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कोणत्याही अपराधासाठी दोषी सिध्द न झालेला असणे आवश्यक आहे. भविष्यात मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कोणत्याही अपराधासाठी दोषी असल्याचे सिध्द झाल्याचे निदर्शनास आल्यास, आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणांस कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२० महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम,२०१९ मधील नियम १६ चा उपखंड (१) मधील तरतुदीनुसार पोलीस शिपाई चालक या पदाकरिता निवड करण्यात आलेले उमदेवार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार विनंतीनुसार जिल्हयाचे बाहेर इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र ठरतील. तसेच सदर नियमातील उपखंड (२) मधील तरतुदीनुसार पोलीस शिपाई चालक या पदावर नियुक्त केलेला कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून इतर पोलीस घटकात बदलीसाठी, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्य शासनाच्या मान्यतेने निर्धारीत केलेली बदलीसाठी पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, ज्येष्ठता आणि इतर अटीं व शर्तींच्या अधिन राहून पात्र राहिल.

२१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण-२०००/प्रक्र-५/२००१/३९, दि. २०/०७/२००२ मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून ०१ वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्य विहित प्रमाणपत्र सादर करावे. सदर मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणारा उमेदवार प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्याची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहिल.

२२. आपणांस महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२३. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) १९५६, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजा, सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम-२०१९ मधील तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचनां, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील वहीत केलेले अन्य नियम व अटी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश व परिपत्रके लागू राहतील.

२४. उमेदवारांस कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल. तसे करणे बंधनकारक राहील.

२५. नवप्रविष्ठ चालक पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यांनतर आपणांस पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपूर्वी त्यांनी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२६. पोलीस महांसचालक,म.रा.मुंबई यांचेकडील अन्वयेचा क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२,दिनांक १७/०८/२०१३ अन्वयेचा स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चीत करण्यांत येईल.

२७. नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय-निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांनी त्यांच्या सेवेचा राजीनामा मंजूरीबाबतचे आदेश व कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच, त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यांत येईल.

२८. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी एक वर्ष सतत सेवा पुर्ण झाल्यानंतर प्रसूती रजेस पात्र राहतील.

२९. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्र/प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत संबंधीत विभागांकडून प्राप्त होणाऱ्या पडताळणी अहवालाचे अधिन राहून सदर नियुक्ती आदेश देण्यात येत आहे. आपण सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

३०. सदरची नियुक्ती ही निव्वळ अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात असून तुमच्या शैक्षणिक अर्हतेबाबतच्या प्रमाणपत्रांच्या पडताळणीच्या अधिन राहून देण्यात येत आहे. भविष्यात सदर प्रमाणपत्रे अवैध अथवा खोटे असल्याचे आढळुन आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३१. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२८/०५/२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतूदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत संबंधीत उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

( विवेक मासाळ )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,
पुणे शहर.

प्रति :- वरील सर्व संबंधीत उमेदवार यांना.
प्रत :- पुणे पोलीस नोटीस - प्रसिध्दीसाठी

**प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, पुणे शहर.**

२/- सदरचे आदेश मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर त्वरीत डकविण्यात यावे. तसेच वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांचा कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक इकडील कार्यालयास कळविण्यात यावा. कर्तव्यावर हजर झालेनंतर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांना किटपेटी व इतर सरकारी सरंजाम अदा करावा.

३/- वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

**प्रत :- प्रमुख लिपीक, लेखा शाखा**

२/- शासन निर्णय क्र.अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक ०६/०४/२०१५ अन्वये वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांची ०१ एप्रिल २०१५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने त्यांचे " राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना" अंतर्गत विहीत नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई चालक यांना लवकरच मुलभुत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

**प्रत :- पोलीस निरीक्षक, संगणक कक्ष, पुणे शहर**

२/- वरील प्रमाणे नियुक्तीचे आदेश त्वरीत www.punepolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच वर नमूद उमेदवार यांनी पोलीस मुख्यालय, पुणे शहर या ठिकाणी दि. /१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता किटपेटी आणि इतर सरंजाम घेणेकामी न चुकता उपस्थित रहावे असेही कळविण्यात यावे.

**प्रत सविनय सादर :-**

**मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई.**
**मा. अपर पोलीस महासंचालक, आस्थापना, महाराष्ट्र राज्य,मुंबई.**

Scanned with OKEN Scanner

गणपतांच्या

# सूचना पत्र.

## चालक पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना.

१.नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता रुपये ५०००/- ॲडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येतांना बरोबर आणावी.

२. हजर होणा-या उमेदवांरानी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा.गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे,बाड-बिच्छाना,जेवणासाठी ताट,वाटी,तांब्या व बादली,मग वगैरे साहित्य बरोबर आणावे.

३. बँक खाते, डी.सी.पी.एस./एन.पी.एस. खाते व सेवापट उघडणेसाठी ३०x३०mm या साईजचे स्वतःचे १० फोटो, मुळ पॅन कार्ड व मुळ आधार कार्ड सोबत आणावे.

Scanned with OKEN Scanner